# डॉक्टर डूलिटिल आणि

# समुद्री डाकू



ह्यू लॉफ्टिंग



# डॉक्टर डूलिटिल

# आणि समुद्री डाकू

मराठी : अश्विनी बर्वे



डॉक्टर डूलिटिल आपल्या प्राण्यांसहित आफ्रिकेहून परत येत होते. त्यावेळी पुशमी-पुलयू पहारा करत होती. “मला समोरून काही धोका दिसत नाही,” तिने आपल्या पुढच्या बाजूने बघत सांगितलं.



त्यानंतर डॉक्टर डूलिटिलने आपल्या दुर्बिणीतून बघितलं. “ते समुद्री डाकुंचे जहाज आहे असं वाटतं.” ते म्हणाले. “आपल्याला इथून लवकर निघायला हवं.”





“पण मला मागच्या बाजूने धोका दिसत आहे,” पुशमी-पुलयूने आपल्या मागच्या बाजूच्या डोळ्याने बघत सांगितलं.



त्यानंतर पुशमी-पुलयू शिडावरून खाली उतरले. “आम्ही इथून कसं पळून जावू शकतो?” त्यांनी आपल्या दोन्ही डोक्यांनी एकदम सांगितलं.

समुद्री डाकूचे जहाज हळूहळू त्यांच्या जवळ आले. समुद्री डाकूनी त्यांना तलवारी, चाकू आणि बंदुका दाखवल्या.

“तुम्ही सगळे लोक एक दीर्घ श्वास घ्या.” डॉक्टर डूलिटिल म्हणाले.

“मग जोरात आपला श्वास शिडावर सोडा,” मग सगळ्या प्राण्यांनी तेच केलं. पुशमी-पुलयूने सगळ्यात जोरात फुंकर मारली. त्याने आपल्या दोन्ही तोंडाने फुंकर मारली. आता त्यांची बोट वेगाने पुढे जाऊ लागली. आता समुद्री डाकूचे जहाज मागे राहिलं.





काहीवेळा नंतर डॉक्टर डूलिटिल आणि त्यांचे साथी एका द्विपावर पोहचले. चिमण्यांच्या चिवचिवने त्यांचं स्वागत झालं.

अरे! असं वाटतं की हे कॅनरी द्विप आहे. मला कॅनरी चिमण्यांचा आवाज ऐकू येतोय. मग ते आपली बोट किनाऱ्याला घेवून गेले.



त्याचवेळी एक छोटा काळा उंदीर डेकवर पळत आला. "मला माफ करा, डॉक्टर डूलिटिल," उंदीर म्हणाला. "मला तुम्हांला काही सांगायचं आहे, तुमची बोट सुरक्षित नाही. ती खराब आहे. ती काहीवेळातच बुडेल."

"तुला हे कसं माहित?" डॉक्टर डूलिटिलने विचारलं.

"उंदरांना सगळं माहीत असतं," उंदीर म्हणाला. "जेव्हा कधी असं होतं तेव्हा आमच्या शेपटीत मुंग्या येतात, तुमचा पाय बधिर झाल्यावर जसं होतं ना बिलकुल तसंच. आमच्या शेपटीने आम्हांला संदेश दिला आहे की रात्र होण्याच्या आधी ही बोट समुद्रात बुडेल."



“चला उंदरांनो,” तो उंदीर ओरडला. “या बोटीतून पळा नाहीतर तुम्ही बुडाल! माझ्या मागे-मागे या!”
मग प्रत्येक दिशेतून उंदीर पळू लागले. ते बोटीतून उडी मारून जमिनीवर पळू लागले. “आम्हांला जागृत केल्याबद्दल धन्यवाद.”

डॉक्टर डूलिटिल ओरडले..

“तू सांगितलेलं मी लक्षात ठेवेन.”





मग डॉक्टर डूलिटिल आपल्या प्राण्यांसहित किनाऱ्यावर उतरले. कॅनरी चिमण्यांनी त्यांना रस्ता दाखवला.

ते सगळेजण उन्हामुळे तहानले होते आणि त्यांना भूक लागली होती. ते बादल्या घेवून ताजं पाणी घ्यायला गेले.



कॅनरी चिमण्या त्यांना एका सुंदर, थंड,स्वच्छ पाण्याच्या तलावाजवळ घेवून आल्या. तिथं सगळ्यांनी आंघोळी केल्या, पोहले आणि आपली थकावट घालवली.

डॉक्टर डूलिटिल यांनी पण अंघोळ केली. पुशमी-पुलयूने आपल्या दोन्ही तोंडांनी प्यायले. डब डब करणारे बदक आनंदाने ओरडू लागले.



त्यानंतर कॅनरी चिमण्या त्यांना एका सुंदर पहाडावर घेवून गेल्या. तिथं चिमण्यांनी त्यांना मधुर गाणं ऐकवलं. पण तेव्हाच अचानक टू–टू समुद्र तटावरून उडत आला. “डॉक्टर,” तो म्हणाला. “जरा लवकर उठा!”

“आमची बोट बुडत आहे का? डॉक्टर डूलिटिलने विचारलं. “अजून तर नाही बुडाली. पण ते समुद्री डाकू आत्ताच तटावर येवून उतरले आहे. जरा तुम्ही येवून बघा.”



मग सगळे पळत पहाडाच्या कडेला गेले. त्यांनी तिथून तटाकडे बघितलं. तिथं त्यांना समुद्री डाकुचे काळे जहाज दिसलं. ते डॉक्टर डूलिटिलच्या बोटीला खेटून उभे होते. “आपल्याला तिथं जावून बघायला हवं,” डॉक्टर डूलिटिल म्हणाले. “आम्हांला तिथं जावून बघायला हवं की ते डाकू काय करत आहे.”



ते पहाडाच्या चढ-उताराच्या रस्त्याने खाली उतरले. ते खूप घाईने खाली आले.



पुशमी-पुलयू सगळ्यात आधी समुद्र तट वर पोहचले. त्याने एका मोठ्या खडकाच्या आडून बघितलं, “ते सगळे डाकू आपल्या बोटीत आहेत,” तो म्हणाला. “ते तिथं चोरी करण्यासाठी सामान शोधत आहेत.”

“त्यांना आपल्या पूर्ण बोटीवर कब्जा करू दे,” डॉक्टर डूलिटिल म्हणाले.
“माझ्या डोक्यात एक विचार आला आहे.”



“आपण त्यांच्या मोठ्या जहाजावर चढून इथून निघून जायचं का?” डॉक्टरांनी विचारलं. “पण तुम्ही लोक एकदम शांत रहा, बिलकुल आवाज करू नका.”

जिपने जहाजाचे लंगर हळूच उचललं. डब-डब आणि गुब-गुबने शिड ताणलं- अजिबात आवाज न करता. डाक्टर डूलिटिलने जहाजाचे स्टेरिंग सांभाळलं.



मग एक भयानक घटना घडली......

पुशमी-पुलयूला शिंकं आली.





समुद्री डाकूनां शिंक ऐकू आली. ते पळत काय झालं ते पाहायला गेले. डाकूंचा पुढारी बेन अलीने डॉक्टर डूलिटिलला काळ्या जहाजाच्या स्टेअरिंग व्हीलवर पाहिलं. “ते आमचं जहाज चोरी करत आहेत!” तो ओरडला. “त्यांना लवकर थांबवा, मित्रांनो!”



लगेचच डाकुनी लांब दोरी फेकली. ते छोट्या नावेतून मोठ्या जहाजावर चढले. त्यांनी आपल्या तलवारी, चाकू आणि बंदुका दाखवल्या.

बेन अली ओरडला,
“तुम्ही माझं मोठं जहाज घेवून पळत होता, का? आता माझं ऐका! मला तुझ्याजवळचे सगळे पैसे दे, नाहीतर मी तुला समुद्रात फेकून देईन.

मग बेन अलीने डब-डब आणि गुब-गुबला पाहिलं.
“हे कोण आहेत?” तो ओरडला.
“एक मोठं बदक आणि एक मोठं डुक्कर!
मित्रांनो यांना पकडा. आज रात्रीच्या खाण्यात
यांना आपण शिजवू”

हे ऐकून डब-डब आणि गुब-गुब भीतीने
कापू लागले. त्यांनी डॉक्टरांना प्रार्थना
केली, “कृपा करून आम्हांला या दुष्ट
डाकूपसून वाचवा, नाहीतर तो आम्हांला
खाऊन टाकेन.”





“हे बघ, बेन अली,” डॉक्टर डूलिटिल म्हणाले.
“तुम्हांला आमचे पैसे पाहिजे आहे, ते घेवून टाका. आमचे सारे पैसे आमच्या बोटीत आहेत. बोटीत सोन्याने भरलेली पेटी आहे.”



तेव्हाच टू-टू डॉक्टरच्या कानात कुजबुजला.
“डॉक्टर, या डाकुंना काही करून त्यांच्या बोटीवर परत पाठवा. नाव लवकरच बुडेल. त्याबरोबर ते दुष्ट डाकू सुद्धा समुद्रात बुडतील.”
“ही चांगली कल्पना आहे!” डॉक्टर म्हणाले.
“मी पुरा प्रयत्न करतो.”



हे ऐकून बेन अली डाकुवर ओरडला. “चला साथिंनो, त्या छोट्या बोटीवर परत चला! त्यात सोन्याने भरलेली पेटी आहे.”

हे ऐकून बाकी डाकू आनंदाने ओरडले. ते जहाजाच्या शिडावरून उडी मारून खाली आले आणि मग ते परत छोट्या बोटीवर गेले.

मग त्या डाकुंनी डॉक्टर डूलिटिलच्या बोटीचा कोपरानकोपरा शोधला. त्यांनी सगळीकडे सोनं शोधलं.

तेव्हा काहीतरी झालं.

बेन अलीने डेकवर पाहिलं. डेक मधून पाणी निघत होते. पाण्याचे फव्वारे हवेत उडत होते.



हळू-हळू पाण्याचं गळणे वाढले आणि अधिक जोरात पाणी येवू लागले. कारंजाच्या धारा वेगाने वर उठू लागल्या.

डॉक्टरांची जुनी बोट बुडू लागली.

डॉक्टर डूलिटिल आणि त्यांचे प्राण्यांनी हे सगळं बघितलं.

“वाह! खूप छान!” जिप ओरडला.

“ती बोट बिलकुल तशीच बुडते आहे जशी त्या उंदराने सांगितली.”





मग बेन अली आणि त्याचे
डाकू मित्रांनी समुद्रात उड्या मारल्या.
डॉक्टरांची जुनी बोट आता समुद्रात खोल
बुडत होती. बुडणाऱ्या बोटीने खूप आवाज
केले.

पण डाकुंना चांगलं पोहता येत होतं. त्यांच्या जवळ अजूनही चाकू, तलवारी, आणि बंदुका होत्या. ते पोहत डॉक्टर डूलिटिल आणि त्यांच्या प्राण्यांपर्यंत पोहचले. “आम्ही तुम्हांला आता चांगलीच मजा दाखवतो, बघाच!”
बेन अलीने पोहत पोहत म्हटलं.



तेव्हाच इतर डाकू भीतीने ओरडले. कोणीतरी त्यांचा पाठलाग करत होतं. “जरा बघ!” त्यांच्यातला एक डाकू ओरडला. “बघ, एक मोठा शार्क आपला पाठलाग करत आहे.”

“एक नाही, अनेक  शार्क्स आहेत” बेन अली ओरडला. “वाचवा! शार्क आपला पाठलाग करत आहे.”



त्यांच्यातल्या एका शार्कने आपलं नाक पाण्याच्या बाहेर काढलं आणि म्हणाला.

“डॉक्टर डूलिटिल तुम्ही एक प्रामाणिक माणूस आहात. तुम्ही प्राण्यांवर खूप प्रेम करतात – शार्क वर पण. तुम्ही आमचे मित्र आहात. पण हे समुद्री डाकू खूप दुष्ट आहेत. आम्ही तुमच्यासाठी यांना एक-एक करून खाऊन टाकू. मग ते तुम्हांला त्रास देणार नाही.”



“आमच्यावर द्या करा,” बेन अली रडत म्हणाला. “या शार्क्स पासून आम्हांला वाचवा. तुम्ही जे म्हणाला ते आम्ही करू.”

“चला ठीक आहे,” डॉक्टर डूलिटिल म्हणाले. “आता तुम्ही समुद्री डाकूंची पाठ सोडा आणि समुद्र किनाऱ्यावर जमिनीवर रहा. तिथं तुम्ही कॅनरी चिमण्यांना खाण्यासाठी धान्याची शेती करा.



“चिमण्यांसाठी दाणे,“ हे ऐकून डाकू ओरडले. “आमच्या सारख्या डाकुंना हे काम शोभत नाही.”



पण डाकूंच्या जवळ दुसरा काही चारा नव्हता. ते पोहत किनाऱ्यावर गेले आणि मग पाण्यातून बाहेर आले..



त्यानंतर डॉक्टर डूलिटिल आणि त्यांचे प्राणी समुद्री डाकुंच्या मोठ्या काळ्या जहाजाने पुढे निघाले. कॅनरी चिमण्या उडत आल्या आणि त्यांनी डॉक्टर डूलिटिलचा निरोप घेतला.

शार्क्सने जहाजाला रस्ता दाखवला.

त्यानंतर डॉक्टर डूलिटिल आणि त्यांचे पाळीव प्राणी कप्तानाच्या कॅबिनमध्ये गेले. ”हे तर खूप सुंदर आहे” टू-टू ओरडला. इथं तर किंमती, मोठे आणि मुलायम गालिचे अंथरले आहेत.

इथं सगळ्या पलंगावर रेशमी चादरी अंथरलेल्या होत्या. इथे सोनं आणि नाण्यांच्या पेट्या ठेवलेल्या होत्या. इथं खाण्यासाठी चांगल्या चांगल्या वस्तू ठेवलेल्या होत्या.



जेवण झाल्यावर डॉक्टर आणि त्यांचे पाळीव प्राणी डेकवर गेले.

पुशमी-पुलयू शिडावर उभी होती.

“मला पुढे काही धोका दिसत नाही,” तिने आपल्या पुढच्या तोंडाने सांगितलं. “मला मागे सुद्धा काही धोका दिसत नाही.” तिने आपल्या मागच्या तोंडाने सांगितलं.

“मग,” डॉक्टर म्हणाले, “आपण सुरक्षित इंग्लडला पोहचू.” आणि तेच झाले.

समाप्त

